# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.

चांदवड जि.नाशिक

सुरक्षितता, विश्वासार्हता, आणि तत्परता यांचा त्रिवेणी सुरेख संगम

## संचालक मंडळ

**संस्थापक :- श्री.प्रा.निकम टी.पी.**

---

| | |
|---|---|
| श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम | चेअरमन |
| सौ.रेखा विलासराव महाजन | व्हा.चेअरमन |
| श्री.तुकाराम पुंडलिकराव निकम | संचालक |
| श्री.देविदास त्र्यंबकराव शेलार | संचालक |
| श्री.निवृत्ती दामोदर निकम | संचालक |
| श्री अरूण शंकरराव सोनवणे | संचालक |
| श्री.नंदकुमार पुंडलिकराव शेलार | संचालक |
| श्री.दत्तात्रेय काशिनाथ गांगुर्डे | संचालक |
| श्री.अशोक शामराव माळी | संचालक |
| श्री.दगाजी रामचंद्र बच्छाव | संचालक |
| श्री.रामदास सदाशिव साळवे | संचालक |
| श्री.उमरावसिंग रघुनाथसिंग परदेशी | संचालक |
| श्री.किशोर दशरथ शेलार | स्विकृत संचालक |
| सौ.कल्पना संजय गांगुर्डे | स्विकृत संचालक |

## कर्मचारी वृंद

| | |
|---|---|
| श्री.विलास पंडीतराव आहेर | मॅनेजर |
| श्री.गजेंद्र बाळू शेलार | लिपीक |
| श्री.सतिश मुरलीधर आहेर | वसुलीअधिकारी |
| श्री.राजेश सुभाष व्यवहारे | कॅशियर |
| श्री.सुशिल दिगंबर पंडीत | शिपाई |

## कायदेशीर सल्लागार

ॲड.श्री.शिवाजीराव महादु सोनवणे

## चार्टड अकौटन्ट

श्री.एस डी.ठाकरे

## वाहन व्हॅल्युअर

श्री.अभयकुमार आर.मेहता , मालेगाव

ऋणातून समृध्दीकडे

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या.

## ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

फक्त सभासदांसाठीच

जा.क्र.वा.स.सन.२०१२ दि.२६/०६/२०१२

आपल्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **"वार्षिक सर्वसाधारण सभा" रविवार दि.१५/०७/२०१२ रोजी सकाळी १०.००वा एन.डि.सी.सी.बँक मिटिंग हॉल मार्केट यार्ड शाखा चांदवड.** येथे आपल्या संस्थेचे **चेअरमन मा.श्री.डॉ.अरूण पुंडलिकराव निकम** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती!

## सभेपुढील विषय

१) मा.नियोजीत अध्यक्षांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वृत्त वाचून कायम करणे
३) सन २०११-२०१२ सालाचे नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद व संचालक मंडळाचा अहवाल वाचुन कायम करणे.
४) सन २०११-२०१२ च्या संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
५) सन २०१२-२०१३ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०११-२०१२ च्या वर्षात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चाला मान्यता देणे.
७) सन २०११-२०१२ वर्षाचे ऑडीट मेमोचे वाचन करून दोष दुरूस्तीस मंजुरी देणे.
८) मा.अध्यक्ष साहेब यांचे पूर्व परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

आपले नम्र

| श्री.विलास आहेर | सौ. रेखा महाजन | श्री.डॉ.अरूण निकम |
|---|---|---|
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

**मा.संचालक मंडळ**

## सुचना

१) ज्या सभासदांना माहिती हवी असेल अगर काही सुचना करावयाच्या असतील त्यांनी दि.०७/०७/२०१२ पर्यंत लेखी कळवावे.
२) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर कोरम असो वा नसो सभेचे कामकाज पुर्ण करण्यात येईल.

# महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था मर्या.

चांदवड जि. नाशिक

## *सन २०११ - २०१२ चा वार्षिक अहवाल*

सस्नेह नमस्कार ......

सर्व सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो ,

**आज ११व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी** आलेल्या सर्व सन्माननीय सभासदांचे महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपुर्वक स्वागत करतो. दि. ३१/०३/२०१२ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या प्रगतीचा आलेख मांडण्यासाठी मी आपल्या समोर उभा आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षातील नफा-तोटा पत्रक ,ताळेबंद संचालक मंडळाच्या वतीने सादर करतांना मला विशेष आनंद होत आहे.

चांदवड तालुक्यातील सर्व सभासदांनी आमच्यावर विश्वास दाखवून मोलाचे सहकार्य केले. ठेवीदारांच्या व सभासदांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतलेली आहे. संस्थने कठीण निकष लावुन कर्जवाटप, कर्जवसुली व दैनंदिन कामकाज केले आहे. त्याचीच फलनिष्पत्ती म्हणुन संस्थेला सलग ६ वर्षे “अ तारांकीत” तर ४वर्षे “अ” ऑडीट वर्ग मिळालेला आहे. हे वर्ष संस्थेचे दशकपुर्तीचे आहे. १०वर्षाच्या अल्पकालावधीत संस्था स्वयंपुर्ण झालेली असुन आर्थिक दृष्टया मजबुत आहे. स्वतःच्या मालकीच्या अद्ययावत भव्य नुतन वातानुकूलीत वास्तुत संगणकीकरणासह सुसज्ज अवस्थेत आज ही संस्था आपण पाहात आहोत.

सन २००१ रोजी समाजाने लावलेले हे छोटेसे रोपटे आज त्याचे वटवृक्षात रूपांतर झाल्याचा चमत्कार आपण पहात आहोत. चांदवड तालुक्यातील एक अग्रगण्य व शिस्तबध्द संस्था म्हणून **महात्मा फुले नागरी सह.पतसंस्थेला** ओळखले जाते. सुरूवातीपासून संस्थेच्या सर्व व्यवहारात नियोजन बध्दता, पारदर्शकता, तत्परता, विश्वासार्हता व आर्थिक शिस्ती बरोबर कार्यालयीन शिस्त राखण्याचे काम संचालक मंडळाने केलेले आहे. ते केवळ आपल्या बहुमोल सहकार्यामुळे शक्य झालेले आहे. म्हणून संस्थेच्या नेत्रदिपक प्रगतीत व नाव लौकीकात आपला मोलाचा वाटा आहे. चांदवड तालुक्यातील अनेक नामांकित पतसंस्था व बँका आहे. त्यांच्याशी निर्मळस्पर्धा करून, दुष्काळ, आर्थिक मंदी व महाराष्ट्र सहकार खात्यांनी लादलेले निर्बंध या सर्वांना सक्षमपणे सामोरी जावून संस्थेने गरजु व होतकरू तरूणांना, व्यावसायिकांना कर्जवाटप केले आहे. सभासदांनी देखील आर्थिक शिस्तीचे दर्शन घडविल्यामुळे आम्ही ९७% कर्ज वसुली करू शकलो ही खरोखरच कौतुकाची गोष्ट आहे.

दरवर्षी वाढता नफा,वाढत्या ठेवी ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह गोष्ट आहे. आज “**महात्मा फुले नागरी सह.पतसंस्था**” ही अंतर - बाहय सुंदर व सक्षम असलेली तालुक्यातील एकमेव संस्था आहे. या श्रेयाचे मानकरी संचालक

मंडळ असले तरी खरे श्रेयाचे मानकरी हे सन्माननीय सभासद आहे. त्यांच्याच सहकार्यामुळे संस्थापक प्रा. निकम टी. पी. यांच्या स्वप्नांना मुर्त स्वरूप आले आहे. संस्थेच्या आजपर्यंतच्या या प्रगतीचे, संस्थेला नावारूपाला आणून उत्तुंग शिखरावर पोहचविण्याचे खरे शिल्पकार संस्थापक प्रा. निकम टी. पी. हे आहे.

संस्थेच्या प्रगतीचे आणखी एक पाऊल पुढे पडावे यासाठी मी आपणासमोर संस्थेच्या हिताची भावी योजना मांडणे पसंद करेल. संस्थेला एका सभागृहाची नितांत गरज आहे. आपण सर्वांनी ठरवले तर काम कठीण असले तरी अशक्य नाही असे मला वाटते. गेल्या वर्षापासून ६00गुणांच्या ऑडीटच्या कठीण परीक्षेतून जावून देखील आपल्या प्रगतीचा आलेख वेगाने उंचावत आहे. या वर्षी देखील सस्थेला अ ऑडीट वर्ग मिळालेला असुन ६00गुणापैकी ५४८ गुण मिळाले आहे. वेटेज ॲव्हरेज १00पैकी ९३ गुण मिळालेले आहे. चांदवड तालुक्यातील कोणत्याही पतसंस्थेला एवढे गुण मिळालेली नाही. याचा तुम्हाला व आम्हाला रास्त अभिमान वाटावा अशी ही बाब आहे. गुणात्मक दृष्टया आपली पतसंस्था नंबर १ आहे हेच आपल्या पतसंस्थेचे खास वैशिष्टये आहे असेच आपले सर्वांचे सहकार्य राहील अशी आशा बाळगतो. संस्था याच वेगाने विकासाच्या दिशेने उंच भरारी घेईल अशी मी संचालकांच्या वतीने ग्वाही देतो. पुनःश्च एकदा आपले मनःपुर्वक हार्दिक स्वागत करून आपल्या शुभेच्छा हृदयाशी बाळगून ११वा वार्षिक अहवाल आपणापुढे सविनय सादर करीत आहे.

**भागभांडवल :-**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल २५,00,000=00रूपये असून दि.३१/0३/२0१२ अखेर संस्थेचे एकुण सभासद संख्या २८३ असून वसूल भागभांडवल १४,५४,000=00 रूपये आहे .अहवाल सालात भाग भांडवल रूपये ९३,७00=00 ने वाढ झालेली आहे.

**राखीव व इतर निधी :-**

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीची व स्थैर्याची कल्पना तिच्या एकूण स्वनिधी वरून लक्षात येते. कारण राखीव व इतर निधी हाच संस्थेचा आत्मा आहे. दि.३१/0३/२0१२ अखेर संस्थेचा निधी रूपये ५५,७२,३५0.१0 असून अहवाल वर्षात निधीमध्ये रूपये ११,३४,३१५=00 ने वाढ झालेली आहे.

**ठेवी :-**

संस्थेचे पारदर्शी कामकाज व संस्थेवरील दृढ विश्वास यामुळे अनेक हितचिंतक व स्नेही बांधवांनी उत्स्फुर्तपणे ठेवी ठेवल्यामुळे ठेवीमध्ये प्रतिवर्षी प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही संस्थेच्या दृष्टीने कौतुकाची गोष्ट आहे. ठेवीत होणारी वाढ ही सभासद व परिवाराच्या विश्वासाचे प्रतिक आहे. या वर्षाअखेर संस्थेच्या ठेवी रूपये २,९४,५५,६९२=00 इतक्या आहे. सदर ठेवी अत्यंत सुरक्षीत आहे असे मी चेअरमन या नात्याने आपणांस सांगू इच्छितो.

**कर्ज वाटप :-**

संस्थेने व्यापारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार, मजूर, नोकरवर्ग उद्योजक इत्यादी सर्व गरजू होतकरू लोकांना 'अ' वर्ग व 'ब' वर्गातून कर्ज वाटप केलेले आहे.

कर्ज वाटप करतांना कर्जदारावर अवलंबून असलेल्या व्यक्ती, परत फेडीची क्षमता, त्यांची विश्वासार्हता व गुणात्मक कसोटीच्या आधारे रूपये २,४१,३६,५९0=00 इतके कर्ज वाटप केलेल आहे. गतवर्षाच्या तुलनेत कर्जवाटपात रूपये २७४२.८२४=00 ने वाढ झालेली आहे.

**थकबाकी :-**

थकबाकी वसूल करणे हे पतसंस्थेच्या कामकाजातील सर्वात कठीण काम आहे. परंतु वसूली हा संस्थांचा आत्मा असून त्यावर संस्थेचे अस्तित्व व विकास अवलंबून असतो. परंतु कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न व सभासदांनी दिलेली मोलाची साथ यामुळे दि. ३१/0३/२0१२ अखेर संस्थेने ९७% इतकी कौतुकास्पद कर्जवसुली केली आहे. थकबाकी सभासदांवर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. यावर्षी सात कर्जप्रकारांची १00% कर्जवसूली करून निरंक थकबाकी करण्याचा संस्थेने उच्चांक गाठलेला आहे. यापुढेही सर्व कर्जदार सभासढांनी असेच सहकार्य करावे अशी
मी विनंती करतो. एन.पी.ए.ची तरतुद पूर्णपणे केलेली असून संस्थेचे एन.पी.ए.चे प्रमाण १.९% इतके आहे.

**गुंतवणूक :-**

सहकार खात्याने पतसंस्थेला घालून दिलेल्या सी.डी.रेशोचे आपल्या पतसंस्थेने पूर्णपणे पालन केलेले आहे. संस्थेने नियोजनपूर्वक पध्दतीने रूपये ९४,६४,७९९=00 रूपयांची गुंतवणूक केलेली आहे.

**संचालक मंडळ सभा :-**

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झालेल्या असून संचालकांनी स्वतःची कामे बाजुला ठेवुन संस्थेच्या विकासासाठी कमाल वेळ दिलेला आहे म्हणुन संचालक मंडळ अभिनंदनास पात्र आहे. यापुढेही असेच सहकार्य मिळेल अशी मी अपेक्षा बाळगतो .

**नफा:-**

गुणात्मक कर्ज वाटप व कमाल कर्जवसुल, खर्चात काटकसर, कुशल व्यवस्थापन व कौशल्यपूर्ण गुंतवणूक या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे या वर्षात संस्थेला २१लाख २४हजार रूपयांचा ग्रॉस नफा झालेला आहे तर

६,२५,१४५=00 रूपये निव्वळ नफा झालेला आहे. या वर्षी संस्थेने ६,२५,१४५=00 रूपयांच्या नफ्यातुन उपविधीच्या अधिन राहुन नियमाप्रमाणे सर्व तरतुदी करण्यात आलेल्या आहे प्रतिवर्षीवाढता नफा संस्थेच्या दृष्टीने गौरवास्पद गोष्ट आहे .

**कर्मचारी परिवार :-**

आपल्या संस्थेस अतिशय कार्यक्षम ,प्रामाणिक व समर्पित भावनेने प्रेरित असे ५कर्मचारी वर्ग लाभलेले आहे .संस्थेच्या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.सस्थेच्या विकासावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असते. म्हणून संस्थेतील कर्मचारी परिवाराने ध्येयाने प्रेरित होवून निष्ठेने व प्रामाणिकपणे काम करावे कारण आपणांस विकासाचा अजून बराच मोठा टप्पा गाठावयाचा आहे.

**लेखा परिक्षण :-**

संस्थेच्या लेखा परिक्षणावरून संस्थेचे खरे चिज समजते संस्थेला गेली ६ वर्षापासुन सतत “अ स्टार” ऑडीट वर्ग मिळत आहे .तर ४ वर्ष'अ' ऑडीट वर्ग मिळालेला आहे. या वर्षी वेटेज ॲव्हरेज १00 पैकी ९३गुण मिळवून संस्थेने चांदवड तालुक्यात प्रतिष्ठेचे व नंबर १चे स्थान मिळविले आहे. याचा आम्हाला अभिमान वाटतो.

**आभार :-**

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीत सर्व सभासद, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मा. सहाय्यक निंबधक श्री. महेश भडांगे साहेब,सहकार व बँकिंग क्षेत्रातील सर्व अधिकारी,श्री. शिवाजीराव सोनवणे (कायदेशिर सल्लागार), श्री. ठाकरे एस डी (सी.ए.), संस्थेचे वाहन व्हॅल्युअर श्री. अभयकुमार मेहता (मालेगांव), सहकार , राजकीय , शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आपला बहुमुल्य वेळ देवून संस्थेला वेळोवेळी मार्गदशन केले,भेटी देवून सुचना केल्या त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो.

‖ जय हिंद...! ‖

आपला स्नेहांकित,

(श्री. डॉ. अरूण निकम)
चेअरमन

# महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

## ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१२ अखेर

| मा. वर्षी | देणी | | मा. वर्षी | मालमत्ता | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ५४९२०.१० | रोख शिल्लक | ५४११०.१ |
| १६०००.०० | बॅंक कलेक्शन खाते | ०.०० | | | |
| | | | १९२२२७.०० | एन डी सी सी बॅंक चालु (करंट) | ५०७२११.० |
| १३६०३००.०० | वसुल भागभांडवल | १४५४०००.०० | ५७५४०.०० | एन डी सी सी बॅंक सेव्हींग खाते | ४०७५९९.० |
| | | | ३८६६१.०० | नामको बॅंक चालु खाते (शाखा चांदवड) | १२६८१.० |
| १७३००१४.०० | मुदत ठेव खाते | २०५७३७१७.०० | ३०६८६.०० | स्टेट बॅंक शाखा चांदवड चालु खाते | ५१७४७.० |
| ५७३७०.०० | अल्पबचत ठेव खाते | ८११२०.०० | १०७७५११.०० | दि चांदवड मर्चन्टन्स बॅंक चालु खाते | १६६९४४४.० |
| ५१३४४२.०० | बचत ठेव खाते | ३४८२५७०.०० | ७३५७.९५ | ॲक्सिस बॅंक शाखा लासलगांव | ४८५१३.९ |
| ३३९६८९.०० | दामदुप्पट ठेव | ३६१९२१.०० | | | |
| ५९६.०० | सुरक्षा ठेव खाते | ९२२.०० | २००००००.०० | एन डी सी सी बॅंक मुदत ठेव खाते | ०.० |
| ९८५४९.०० | जेष्ठ नागरीक ठेव योजना | ४९५५४४२.०० | ४५०७९३२.०० | नामको बॅंक मुदत ठेव (चांदवडशाखा) | ६००००००.० |
| | | | ३६९१९९४.०० | स्टेट बॅंक (शाखा चांदवड) मुदत ठेव | २४१८५७५.० |
| ७२६५५०.०० | राखीव निधी | ८७४२२५.०० | २०३५०.०० | लॉकर डिपॉझिट | २०३५०.० |
| १९०४७३.५० | इमारत निधी | २४१९०७५.५० | ७३३४९१.०० | रिझर्व्ह फंड एन डी सी सी बॅंक | ८६८४९१.० |
| ४०३८८.०० | सभासद लाभांश समिकरन | ४९५९७.०० | ५९७२.०० | इमारत फंड खाते एनडीसीसी बॅंक चांदवः | ६१८९.० |
| १६८२१८.०० | सभासद कल्याण निधी | २३१०५२.०० | ५००.०० | नाशिक जि पत फेडरेशन शेअर्स | ५००.० |
| १६११३९.५० | विमा निधी | २८११८५.५० | १०००.०० | महा. राज्य पतसंस्था फेडरेशन शेअर्स | १०००.० |
| ३५०१६६.०० | झिज फंड | ५३५१६६.०० | १०५०.०० | नाशिक जि मध्य. सह बॅंक लि नाशिक शे | १०५०.० |
| ११०९१०.१० | संशयीत व बुडित कर्ज निधी | ४७०७५९.१० | १५०००००.०० | स्टेट बॅंक मुदत ठेव शाखा वडाळीभोई | ०.० |
| ४४८४०.०० | बोर्ड व स्टाप ट्रेनिंग फंड | ५१८४०.०० | .०० | पोस्ट ऑफिस पी पी एफ खाते चांदवड | १४८६४४.० |
| ९१२५.०० | फर्निचर निधी | ४६९१२५.०० | | | |
| ९००.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी | ०.०० | २४८७५०१.०० | वैयक्तीक कर्ज | २७३८४६७.० |
| १०९४२५.०० | संगणक निधी | १०९४२५.०० | ४७६४३९६.०० | हायरपर्चेस कर्ज | ४४७८५८३.० |
| ६५९००.०० | इलेक्ट्रीकल निधी | ६५९००.०० | ५२३०५१३.०० | मॉरगेज कर्ज | ४२४६८०६.० |
| .०० | ए.सी. निधी | १००००.०० | १४३०५०२.०० | नजरगहाण कर्ज | ११३५१७२.० |
| .०० | धर्मदाय निधी | ५०००.०० | ३४५७७५२.०० | सोने चांदी तारण कर्ज | ६३४०६९५.० |
| | | | ४६४३००.०० | मुदत ठेव ॲडव्हान्स | १०६७१००.० |
| २९९१२.०० | ऑडिट फी देणे | ३५४०५.०० | ७३९७०२.०० | गृहतारण कर्ज | १७२०३८४.० |
| ५०००.०० | शिक्षण निधी देणे | ५०००.०० | २८१९१००.०० | टर्म लोन | २४०९३८३.० |
| ४५६८.९५ | मुदत ठेवीवरिल व्याज देणे | ११३७७७१.९५ | | | |

महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

ताळेबंद पत्रक दिनांक ३१/०३/२०१२ अखेर

| मा. वर्षी | देणी | | मा. वर्षी | मालमत्ता | |
|---|---|---|---|---|---|
| ५०००.०० | आयकर तरतुद | ०.०० | २०००.०० | टेलिफोन अनामत खाते | २०००.० |
| ३००००.०० | एन पी ए तरतुद | ०.०० | .०० | गुंतवणुकिवरील येणे व्याज | ३५३१९४.० |
| २३५००.०० | सेवक सानुग्रह अनुदान | २८९००.०० | ८०००.०० | डि टी पी एल सेवा केंद्र डिपॉ | ८०००.० |
| १३८५.०० | अनामत खाते | ७०००.०० | ६२६९.०० | डिगीटच टेलिमॅक्स प्रा. लि. पुणे | २५२८५.० |
| .०० | पी पी एफ देणे खाते | १४८६४४.०० | | | |
| | | | ८५८३७५.०० | कायम मालमत्ता खाते | ८५८३७५.० |
| | | | ८२१७१६.०० | डेडस्टॉक खाते | ८६८०६६.० |
| | | | २०४३.०० | लायब्ररी खाते | २२९३.० |
| ५६००००.०० | एकुण नफा | ६२५१४५.०० | | | |
| ३७०१३३६१.०५ | | ३८४६९९०८.०५ | ३७०१३३६१.०५ | | ३८४६९९०८.० |

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

### नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१२ अखेर

| मा. वर्षी | खर्च | | मा. वर्षी | उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| ७०१.०० | बॅंक चार्जेस | १३५०.०० | २५२८.०० | नोटीस खर्च जमा | १८३०.० |
| | | | ३९२.०० | अल्पबचत कमिशन खाते (उत्पन्न) | ०.० |
| .०० | संशयीत बुडीत कर्ज खर्च खाते | २०००००.०० | | | |
| ५००.०० | व्यवसाय कर खर्च | २०००.०० | ८०४०९०.०० | हायरपर्चेस कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | ७६११३३.० |
| ५०००.०० | शिक्षण निधी खर्च | ५०००.०० | १०३०९५९.०० | मॉरगेज कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ६३२०६२.० |
| २५०००.०० | ऑडिट फि खर्च | ३००००.०० | ९५०७१.०० | नजरगहाण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न | २२२२०३.० |
| .०० | घसारा खर्च | १८५०००.०० | ५२०६५१.०० | सोनेचांदी कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ६८९८७७.० |
| २३००.०० | सामाजिक कार्यक्रम खर्च | ०.०० | १२०३१५.०० | मुदत ठेव अडव्हान्स व्याज जमा (उत्पन्न) | ३६५३६.० |
| [illegible]०५००.०० | मानधन खाते | ९००००.०० | १३३५६२.०० | गृहतारण कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | १३६२५८.० |
| ३७८२७.०० | दुरूस्ती व देखभाल खर्च खाते | ३४९८०.०० | ६१५.०० | दंड व्याज खाते | ०.० |
| .०० | ग्रामपंचायत कर | ४३३७.०० | १९७००२.०० | टर्म लोनवरिल व्याज | ३९४१८५.० |
| २४५००.०० | भविष्य निर्वाह निधी | २७०००.०० | ४०२१४९.०० | वैयक्तीक कर्जावरील व्याज जमा (उत्पन्न) | ४७२२८९.० |
| ४०००.०० | लॉकर भाडे | ४०००.०० | | | |
| ५९२०.०० | ए सी खर्च खाते | ०.०० | ९८१७८५.०० | गुंतवणुकिवरील व्याज खाते | १९२४९२९.० |
| २१३२१.०० | अल्पबचत कमिशन खाते (खर्च) | २४४२३.०० | | | |
| २२००.०० | वकिल फी खर्च खाते | १९६५०.०० | १०.०० | अल्पबचत स्टेशनरी जमा | १०.० |
| २०७००.०० | लाईट बिल खर्च | ३६९६०.०० | | | |
| १३६९५.०० | पोस्टेज व टेलिफोन खर्च | १०५४९.०० | १२६७८.०० | डि. डि. कमिशन | ४९४५.० |
| १७३०५.०० | प्रिंटिंग व स्टेशनरी | ३१८३७.०० | | | |
| [illegible]४१८०.०० | किरकोळ खर्च | ४२३५२.०० | ८०.०० | प्रवेश फी | ०.० |
| २००.०० | प्रवास खर्च | ५५०.०० | | | |
| १४६२१.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १६३३५.०० | ३००.०० | सशस्त्र सेना ध्वजनिधी २००७ निधी | ०.० |
| १६०००.०० | जाहिरात खर्च खाते | ४११००.०० | | | |
| .०० | इतर खर्च | १०००.०० | | | |
| १०३८१.०० | जेष्ठ नागरिक ठेवीवरिल व्याज | ११४८.०० | | | |
| १२७१०९.०० | मुदत ठेवीवरील व्याज खर्च | ३५३०००५.०० | | | |
| ७८१८०.०० | बचत ठेवीवरील व्याज खर्च | ५८५३४.०० | | | |
| ९०४७.०० | अल्पबचत ठेवीवरील व्याज खर्च | १००२.०० | | | |

## महात्मा फुले नागरी सह. पतसंस्था मर्या. चांदवड

### नफा तोटा पत्रक दिनांक ३१/०३/२०१२ अखेर

| मा.वर्षी | खर्च | | मा.वर्षी | उत्पन्न | |
|---|---|---|---|---|---|
| २११०००.०० | पगार खाते | २५२०००.०० | | | |
| १६००००.०० | ताळेबंद कडे एकुण नफा | ६२५१४५.०० | | | |
| ४३०२१८७.०० | | ५२७६२५७.०० | ४३०२१८७.०० | | ५२७६२५७.० |